(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)
(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक
## Meeting of the Board of Management

## कार्यवृत्त
## Mminutes of Meeting

**बैठक क्रमांक** : 182
(Meeting Number)

**स्थळ** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२

**Venue** : Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open, University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : शनिवार ,दिनांक ३० एप्रिल २०२२
**(Day and Date )** Saturday, 30th April 2022

**वेळ** : दुपारी १२.00 वाजता

**Time** : 12.00 Noon

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची बैठक क्र.182 शनिवार दि. 30 एप्रिल 2022 दुपारी 12 वाजता विद्यापीठ मुख्यालयातील सभागृह, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1.डॉ.पी.जी.पाटील, कुलगुरू | अध्यक्ष | Online |
| 2. मा.प्रा. महेंद्र लामा, नवी दिल्ली | सदस्य | |
| 3. डॉ. सत्यकामा, प्र कुलगुरू, इंगांरामुवि, नवी दिल्ली | सदस्य | Online |
| 4.मा.श्री.ज्ञानदेव नाठे, संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचे प्रतिनिधी | सदस्य | |
| 5.मा.डॉ.अनिल कुलकर्णी,पुणे | सदस्य | |
| 6. मा.श्री.उदित सेठ, मुंबई | सदस्य | Online |
| 7. मा.डॉ. सुधीर तांबे, नाशिक | सदस्य | Online |
| 8. डॉ.जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | सदस्य | |
| 9.मा.श्री. विलास शिंदे, नाशिक | सदस्य | Online |
| 10 डॉ.दिनेश भोंडे, कुलसचिव | सचिव | |

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | |
|---|---|
| 11.मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 12. मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 13. मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 14. मा, संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य |
| 15. मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 16 प्रा. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर | सदस्य |
| 17. मा.डॉ.संजय चोरडिया, पुणे | सदस्य |
| 18. मा. आ.श्री. सुहास कांदे,नाशिक | सदस्य |
| 19. मा.आ.श्रीमती सरोज आहिरे,नाशिक | सदस्य |

| **ठराव** | **ठराव क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| 182.1.0 | 182.1.1 | **स्वागत** (Welcome)<br>बैठकीच्या सुरूवातीला कुलसचिवांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. प्रथम मा. कुलगुरु डॉ.पी.जी.पाटील यांनी स्वतःचा परिचय करुन दिला. त्यानंतर प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या सन्माननीय सदस्यांनी आपला परिचय करून दिला. त्यानंतर बैठकीच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | | दि. 3 डिसेंबर 2021 रोजी झालेल्या 180 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद एकत्रित बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे |
| | 182.2.1 | To confirm the minutes of the 180th combined Meeting of the Board Of Management and Academic Council held on 3rd Dec. 2021 |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - दि. 3 डिसेंबर 2021 रोजी झालेल्या 180 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद एकत्रित बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करण्यात आले. |
| | | दि. 3 डिसेंबर 2021 रोजी झालेल्या 181 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे |
| | 182.2.2 | To confirm the minutes of the 181thMeeting of the Board Of Management held on 3rd Dec. 2021 |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - दि. 3 डिसेंबर 2021 रोजी झालेल्या 181 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करण्यात आले. |
| 182.2.0 | | दि. 3 डिसेंबर 2021 रोजी झालेल्या 180 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद एकत्रित बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल |
| | 182.2.3 | Report of the Proceedings of the 180th combined meeting of the Board of Management and Academic Council held on 3rd Dec. 2021 |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** दि. 3 डिसेंबर 2021 रोजी झालेल्या 180 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद एकत्रित बैठकीतील (Online) झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| | | दि. 3 डिसेंबर 2021 रोजी झालेल्या 181 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल |
| | 182.2.4 | Report of the Proceedings of the 181th Board of Management meeting held on 3rd Dec. 2021 |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** दि. 3 डिसेंबर 2021 रोजी झालेल्या 181 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| 182.3.0 | | सखोल चर्चेचे विषय (In-Depth Discussion Items) |
| | | विद्यापीठामध्ये सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट (ललित कला केंद्र) स्थापन करण्याबाबत |
| | | To establishment Center for Performing Arts (Lalit Kala Kendra) in the University |
| | 182.3.1 | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठामध्ये सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट (ललित कला केंद्र) स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.<br>सदर केंद्रामार्फत सुरु करण्यात येणा-या शिक्षणक्रमांबाबत, तसेच आवश्यक मनुष्यबळ इ. माहिती सादर करण्यात यावी असे मा.सदस्यांनी सांगितले. |
| | | वृक्ष लागवडीसाठी विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्याचा अध्यादेश मान्यतेसाठी सादर |
| | 182.3.2 | Ordinance to award additional marks to the students for tree plantation |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वृक्ष लागवडीसाठी विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्याचा अध्यादेशास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 182.3.3 | अल्युमनी असोसिएशन विद्यार्थी सदस्यता शुल्काबाबत प्रस्ताव मान्यतेसाठी सादर |

| | | |
|---|---|---|
| | | To approve Student Membership fee of Alumni Association |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - ॲल्युमनी असोसिएशनचे विद्यार्थी सदस्यता शुल्क रु. २/- (रूपये दोन) मंजुर करण्यात आले, सदर शुल्क प्रवेशाच्यावेळी घेण्यात यावे यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 182.3.4 | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या संगणक केंद्रातील तांत्रिक पदांना पदोन्नती देण्यासाठी स्थापन केलेल्या समितीचा अहवाल, त्यावरील अभिप्राय मान्यतेसाठी सादर |
| | | To approve the report for the promotion of technical posts in the Computer Center of Yashwantrao Chavan Maharashtra Open University. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या संगणक केंद्रातील तांत्रिक पदांना पदोन्नती देण्यासाठी स्थापन केलेल्या समितीचा अहवाल तसेच त्यावरील अभिप्रायास मान्यता देण्यात आली.<br>पदोन्नती देण्याबाबत स्टॅट्युट तयार करण्यात यावा. त्यासाठी Statute Committee स्थापन करावी, सदरील समितीने स्टॅट्युट तयार करून ड्राफ्ट स्टॅट्युट पुढील व्यवस्थापन मंडळ बैठकीत ठेवावा यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 182.3.5 | वित्त समिती बैठक दि.11 फेब्रुवारी 2022 चे कार्यवृत्त मान्यतेसाठी सादर |
| | | Submitted for approval -The minutes of the meeting of Finance Committee held on 11[th] Feb. 2022 |
| | | वित्त समिती ठराव क्र. 19.3.1- विद्यापीठाचा 27 वा पदवीप्रदान समारंभ आयोजनासाठी येणा-या रुपये 25.50 लक्ष (रूपये पंचवीस लक्ष पन्नास हजार) खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदर शिफारस मा.व्यवस्थापन मंडळासमोर सादर करण्यात यावे असे ठरले |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** — वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार शिफारस मान्य करण्यात आली. |
| | (02) | वित्त समिती ठराव क्र. 19.3.2- सेंट्रल बॅक ऑफ इंडिया,य.च.म.मु.वि.शाखेमध्ये बंद स्थितीत असेलेले खालील 5 बचत खाते बंद करुन त्यातील रक्कम विद्यापीठाच्या 1323004456 मध्ये वर्ग झाली आहे.<br>1323004999 — 1092 रु. 3171111817 - 1999231 रु.<br>3181477144- 8007093 रु. 1323009261 — 4046 रु.<br>वरीलप्रमाणे बॅंक खाते बंद करण्यास व त्यातील शिल्लक रक्कम वर्ग करण्यास सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली. सदर शिफारस मा.व्यवस्थापन मंडळासमोर सादर करण्यात यावे असे ठरले |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** — वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार शिफारस मान्य करण्यात आली. |
| | (03) | वित्त समिती ठराव क्र. 19.3.4 - बांधकाम समिती सभा दि. 26 नोव्हेबर 2021, दि. 16 डिसेंबर 2021, दि. 30 डिसेंबर 2021 झालेल्या बैठकीतील विषयास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>1. विद्यापीठामार्फत नव्याने उभारण्यात येणा-या इमारती, रंगसंगती इ. बाबतीत एकरुपता असावी अशी सुचना श्रीमती सरोज आहिरे यांनी केली तसेच |

| | | |
|---|---|---|
| | | विद्यापीठामध्ये विद्युतीय कामे करतांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घ्यावे असे ठरले.<br>2. गिरणारे रोड (विद्यापीठ फाटा) ते विद्यापीठ मुख्यालय हा 2.5 कि.मी.चा रस्ता अतिशय खराब परिस्थीतित आहे. यावरुन दुचाकी आणि चारचाकी वाहनाने प्रवास करणे धोकादायक आहे. सदरचा रस्तादुरुस्तीसाठी विद्यापीठाने 5 कोटी इतका निधी उपलब्ध करुन द्यावा याबाबत वित्त समितीमध्ये चर्चा झाली. या चर्चेदरम्यान सदस्यांनी भांडवली खर्चाद्वारे (Capital Expenditure) विद्यापीठाची मालमत्ता निर्माण होते. तसेच ही जागा विद्यापीठाच्या मालकीची नसून ती शासकीय आहे व त्यामुळे त्यावर बांधकाम करणे अयोग्य ठरेल असे मत मांडले. त्यामुळे सदर जागेचा ताबा शासनाने विद्यापीठाला दिल्यास त्यावर बांधकाम करणे शक्य होईल. बांधकाम समितीच्या सर्व ठरावांना मा.व्यवस्थापन मंडळासमोर शिफारस करण्याबाबत सर्वानुमते ठरले |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव —** 01) बांधकाम समिती सभा दि. 26 नोव्हेबर 2021, दि. 16 डिसेंबर 2021, दि. 30 डिसेंबर 2021 झालेल्या बैठकीतील विषयास व ठरावांना वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार मान्यता देण्यात आली.<br>02) गिरनारे रोड ते विद्यापीठ मुख्यालय हा रस्ता नागरिकांसाठी आहे, त्यामुळे त्यावर खर्च करता येणे शक्य नाही असे ठरले |
| | (04) | वित्त समिती ठराव क्र. 19.3.5- खरेदी समितीचे इतिवृत्त दि. 4.10.2021, दि.29.10.2021, दि. 22.01.2022 यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. खरेदी समितीचे सर्व ठरावांना मा.व्यवस्थापन मंडळासमोर शिफारस करण्याबाबत सर्वानुमते ठरले |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव —** खरेदी समितीचे इतिवृत्त दि. 4.10.2021, दि.29.10.2021, दि. 22.01.2022 यास वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार मान्यता देण्यात आली. |
| | (05) | वित्त समिती ठराव क्र. 19.3.6- मा.मंत्री, उच्च आणि तंत्रशिक्षण यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक 08.12.2021 च्या पत्रानुसार अतिवृष्टीमुळे विविध ग्रंथालयाचे नुकसान झालेले आहे. त्यापैकी 06 ग्रंथालयांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती करण्यात आली आहे. यासंदर्भात वित्त समिती बैठकीमध्ये सखोल चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांकडून मिळणा-या शैक्षणिक शुल्कातील आपत्कालीन निधीमधून रुपये 15 लक्ष इतकी रक्कम या आर्थिक वर्षाच्या निधीतून मान्य करण्याची शिफारस व्यवस्थापन मंडळाला करावा असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन मंडळासमोर शिफारस करण्याबाबत सर्वानुमते ठरले |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव —** वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार शिफारस मान्य करण्यात आली. |
| | (06) | वित्त समिती ठराव क्र. 19.3.7-<br>1) श्री. किशोर . शिंदे यांचे रु .8,54,485 रुपयांचे वैद्यकीय देयक अदा करण्याबाबत मा. कुलगुरु यांना रुपये 5 लक्ष पर्यंतचे अधिकार आहेत त्यापुढील रक्कम अदा करण्यासाठी अधिकार मा.व्यवस्थापन मंडळास आहे. तथापि वैद्यकीय देयके अदा करतांना शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी असे ठरले<br>2) कै. प्रकाश फ.देशमुख यांचे बाह्यरुग्ण म्हणून 2,30,495.00 अदा करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदरचा कर्मचारी मयत असल्यामुळे मानवतेच्या |

| | | |
|---|---|---|
| | | भुमिकेतून त्याचे वैद्यकीय देयक अदा करावे असे सर्वानुमते ठरले. अशी शिफारस मा.व्यवस्थापन मंडळासमोर करावी असे ठरले.<br>3) वैद्यकीय देयके अदा करण्यासंदर्भातील चर्चेदरम्यान सद्यस्थितीत विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांसाठी मेडिक्लेम पॉलिसी संदर्भात 3 लक्ष रुपये पर्यंतचा विमा उतरविला आहे. सदरची विमा रक्कम ही 5 लक्ष इतकी करावी असे सर्वानुमते ठरले वरीलप्रमाणे बाबी मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन मंडळासमोर ठेवण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार शिफारस मान्य करण्यात आली. |
| | (07) | वित्त समिती ठराव क्र. 19.3.8 –सन 2021-22 या आर्थिक वर्षातील सुधारित अंदाजपत्रकाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्वानुमते सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. सुधारित अंदाजपत्रक मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन मंडळासमोर शिफारस करण्याबाबत सर्वानुमते ठरले |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – सन 2021-22या आर्थिक वर्षातील सुधारित अंदाजपत्रकाबाबत सखोल चर्चा करण्यात आली. वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार सुधारित अंदाजपत्रक मान्य करण्यात आले. |
| | (08) | वित्त समिती ठराव क्र.19.3.9 - विद्यापीठ प्रवेशद्वार ते प्रशासकीय इमारतीसमोरील 8 मीटर रूंदीचा रस्ता यांना जोडण्यासाठी 100 मीटर लांबीचा जोडरस्ता बनविणेबाबतचा प्रस्तावासंदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – आंब्या, संत्राची फळझाडे तोडली जातील त्यामुळे सदरचा प्रस्ताव सध्या स्थगित ठेवावा असे ठरले. |
| | (09) | वित्त समिती ठराव क्र. 19.3.10 – खरेदी समितीचे इतिवृत्त दि. 11.2.2022 यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदरची खरेदी GeM च्या माध्यमातून करावी असे ठरले. खरेदी समितीचे सर्व ठरावांना मा.व्यवस्थापन मंडळासमोर शिफारस करण्याबाबत सर्वानुमते ठरले |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – खरेदी समितीचे इतिवृत्त दि. 11.2.2022 यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. (फर्निचर खरेदीबाबत मा.सदस्य डॉ.महेंद्र लामा यांनी विद्यापीठात सध्या असलेले जुने फर्निचर तसेच नव्याने खरेदी करण्यात आलेले फर्निचर याचा ताळमेळ घ्यावा. त्यासाठी भविष्यात पॉलिसी ठरवावी असे सुचविले.) तसेच वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार शिफारस मान्य करण्यात आली. |
| 182.3.6 | | वित्त समिती बैठक दि. 30 मार्च 2022 चे कार्यवृत्त मान्यतेसाठी सादर |
| | | Submitted for approval -The minutes of the meeting of Finance Committee held on 30th March 2022 |
| | | वित्त समिती ठराव क्र. 20.3.1- वित्त समितीने विद्यापीठाच्या 2022-23 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास मान्यता दिली. अंदाजपत्रक व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारस करावी. आर्थिक वर्ष 2022-23 च्या अंदाजपत्रकास मा.व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळेपर्यंत दैनंदिन खर्चास मान्यता देण्यात आली. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – मा.कुलसचिव डॉ.दिनेश भोंडे यांनी आर्थिक वर्ष 2022-23 |

| | | |
|---|---|---|
| | | चे अंदाजपत्रक सादर केले त्यावर सविस्तर चर्चा होऊन अंदाजपत्रक मंजुर करण्यात आले तसेच 01 एप्रिल 2022 पासून करण्यात आलेल्या खर्चास वित्त समितीने केलेल्या शिफारशीस मान्यता देण्यात आली. |
| | (02) | वित्त समिती ठराव क्र. 20.3.2- सन 2021-22 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणाचे काम सी.आर.सगदेव आणि कं. चार्टड अकाउटंट यांना देण्यास मान्यता देण्याबाबत नोंद घेण्यात आली. मा.व्यवस्थापन मंडळासमोर शिफारस करण्याबाबत सर्वानुमते ठरले |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार शिफारस मान्य करण्यात आली. |
| | (03) | वित्त समिती ठराव क्र. 20.3.3- दि. 3 मार्च 2022च्या खरेदी समितीच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले विषय क्र. PC/2021-22/57 संगणक विद्याशाखेचा एम.सी.ए. शिक्षणक्रम आणि मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचा एम.ए. शिक्षणक्रम (सन 2018-19 ते 2021-22 या चार वर्ष कालावधी) पुस्तकांचे स्वामित्व रक्कम रूपये 3,26,19,180/- इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली यांना देण्याबाबतच्या विषयास सध्या स्थगिती देण्यात आली. त्या व्यतिरिक्त खरेदी समितीचे इतर सर्व विषयास मान्यता देण्यात आली. खरेदी समितीचे सर्व ठरावांना मा.व्यवस्थापन मंडळासमोर शिफारस करण्याबाबत सर्वानुमते ठरले. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – सदर विषयाच्यावेळी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली यांचे प्र-कुलगुरु व व्यवस्थापन मंडळ सदस्य प्रा.सत्यकाम यांनी सदरचा विषय हा त्यांचे विद्यापीठाशी संबंधित असल्यामुळे या विषयात सहभागी होऊ शकत नसल्याचे सांगितले. त्यानंतर सविस्तर चर्चा करुन मा.सदस्य डॉ.महेंद्र लामा यांनी यासंदर्भात विद्यापीठाने इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाबरोबर या अगोदर केलेला करार व त्यानंतर केलेली कार्यवाही यांचा एकत्रित विचार करुन मा. कुलगुरुंनी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठास पत्र पाठवावे असे सुचविले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | (04) | वित्त समिती ठराव क्र. 20.3.4- दुय्यम प्रमाणपत्र /दुय्यम मार्कशीट देणेसाठी लागणारे शुल्क हे कालावधी 1-3 वर्ष, 3-5 वर्षापेक्षा अधिक कालावधीकरिता शुल्क निर्धारण करणेबाबत प्रचलित शुल्क व कार्यपध्दती यापुर्वी प्रमाणेच सुरु राहील यात कोणताही बदल करण्यात येऊ नये असे ठरले |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार शिफारस मान्य करण्यात आली. |
| | (05) | वित्त समिती ठराव क्र. 20.3.5 – विद्यापीठाच्या मे-जुन 2022 च्या परीक्षा आयोजित करणेसाठी विद्यापीठाच्या परीक्षा आयोजनाबाबत रू.22 कोटी 10 लक्ष इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली. मा.व्यवस्थापन मंडळासमोर शिफारस करण्याबाबत सर्वानुमते ठरले. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार शिफारस मान्य करण्यात आली. |
| | (06) | वित्त समिती ठराव क्र. 20.3.6 -अभ्यासकेंद्रांनी मुदतीत अंतर्गत गुण सादर न केल्यास विलंब शुल्क आकारणेबाबत. |

| | | |
|---|---|---|
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार शिफारस अमान्य करण्यात आली, त्याऐवजी अभ्यासकेंद्रांच्या बैठका घेऊन या अनुषंगाने योग्य मार्गदर्शन करावे अशी सुचना मा.सदस्य डॉ.महेंद्र लामा यांनी केली. |
| (07) | | वित्त समिती ठराव क्र. 20.3.7 –तीन वर्ष कालावधीकरिता Network Active Components च्या वार्षिक देखभाल खर्च अंदाजे रु. 11.50 लक्ष यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. मा.व्यवस्थापन मंडळासमोर शिफारस करण्याबाबत सर्वानुमते ठरले. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार शिफारस मान्य करण्यात आली. |
| | 182.3.7 | विद्यापीठातील चार सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या निवृत्तीवेतनाच्या अनुषंगाने त्रुटीबाबत समितीचा अहवाल मान्यतेसाठी सादर |
| | | To approve the report of Committee to condone the mentioned irregularities... |
| | | (शासनाच्या दि. 13 ऑगस्ट 2019 व दि. 17 सप्टेंबर 2019 पत्रान्वये विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांमधील अनियमितता शिथिल करणेबाबत व्यवस्थापन मंडळास अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार व्यवस्थापन मंडळ ठराव क्र.170.3.10 दिनांक 18.10.2019 अन्वये वयोधिक्य क्षमापित करणे आणि इतर प्रकरणांबाबत समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार मा.कुलगुरू यांनी व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ.अनिल कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. या बैठकीत तीन प्रकरणे सादर आलेली असून त्यापैकी<br>1) श्री.आनंद यादव यांना निवड समितीने नियुक्तीच्या वेळी अतिप्रदान करण्यात आलेली तीन अतिरिक्त वेतनवाढीबाबतची त्रुटी वगळणेबाबत.<br>2) श्री हिरालाल दामोदर माळवे दि. 31 जुलै 1997च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार श्री.माळवे यांनी ऑक्टोबर 1984 मध्ये मरीठी लघुलेखनात 120 स्पीड प्राप्त केलेला आहे त्याबाबतची त्रुटी वगळण्याबाबत..<br>3) श्रीमती शकिला मोहमदयुसुफ कोकणी यांचे वयोधिक्य क्षमापित करणेबाबत शिफारशी केलेल्या आहेत. सदर शिफारशी योग्य त्या निर्णयास्तव व्यवस्थापन मंडळास सादर |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - शासनाच्या दि. 13 ऑगस्ट 2019 आणि दि.17 सप्टेंबर 2019 पत्रान्वये विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांमधील अनियमितता शिथिल करणेबाबत व्यवस्थापन मंडळास अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार व्यवस्थापन मंडळ ठराव क्र.170.3.10 दिनांक 18.10.2019 अन्वये वयोधिक्य क्षमापित करण्याबाबत व इतर प्रकरणांबाबत व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ.अनिल कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. या बैठकीत सादर करण्यात आलेल्या पुढील तीन प्रकरणात<br>1) श्री.आनंद यादव यांना निवड समितीने नियुक्तीच्या वेळी अतिप्रदान करण्यात आलेल्या तीन अतिरिक्त वेतनवाढीची जादा रक्कम विद्यापीठात भरलेली आहे, त्यामुळे वेतनवाढीबाबतची त्रुटी वगळण्याची शिफारस करण्यात येत आहे.<br>2) श्री हिरालाल दामोदर माळवे यांनी नियुक्तीपूर्वी ऑक्टोबर 1984 मध्ये मराठी लघुलेखनात 120 चा स्पीड प्राप्त केलेला असल्याने त्याबाबत अधिकृत प्रमाणपत्र सादर |

| | | |
|---|---|---|
| | | केलेले असून लघुलेखक (उच्चश्रेणी) साठी आवश्यक 120 स्पीड दिसून येत आहे. त्यामुळे याबाबत काढलेली त्रुटी लागू होत नाही. त्यामुळे श्री.माळवे त्यांच्या संदर्भातील त्रुटी वगळण्याची व त्यांच्या निवृत्तीवेतन प्रकरणाची शिफारस करण्यात येत आहे.<br>3) श्रीमती शकिला मोहमदयुसुफ कोकणी यांच्याबाबत समितीला वयोधिक्यात आढळून आले नसल्याने त्यांच्या वयोधिक्याची त्रुटी वगळण्याची शिफारस करण्यात येत आहे.<br>वरील तीनही प्रकरणी व्यवस्थापन मंडळाने नियुक्त केलेल्या समितीने केलेली शिफारस सर्वानुमते मान्य करण्यात आली आहे. |
| | 182.3.8 | तक्रार निवारण समिती दि. 26 फेब्रुवारी 2022 अहवाल मान्यतेसाठी सादर |
| | | Reports of Grievance Redressal Committee dated 26thFeb. 2022 for Submitted for approval |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - दि. 26 फेब्रुवारी 2022 रोजी झालेल्या तक्रार निवारण समितीमध्ये खालील तीन कर्मचाऱ्यांचे अहवाल ठेवण्यात आले होते.<br>१) श्रीमती सुचिता शिवाजी बेरड, सहायक<br>२) श्रीमती सुनंदा अरुण मोरे, सहयोगी प्राध्यापक<br>३) श्रीमती ऋचा राजेश गुजर, सहायक प्राध्यापक,<br>तक्रार निवारण समितीने सादर केलेला अहवाल व्यवस्थापन मंडळाने स्वीकारला असून तक्रार निवारण समितीने केलेली शिफारस सर्वानुमते मान्य करण्यात आली. |
| 182.4.0 | | कार्योत्तर मान्यतेचे विषय - Post Facto Approval |
| | 182.4.1 | विद्यापीठाच्या विविध विभाग/ केंद्र/कक्ष व विद्याशाखा येथे करारावरील सहयोगी सल्लागार, शैक्षणिक सल्लागार, संयोजक(शैक्षणिक) व सहायक संयोजक (प्रशासकीय) यांच्या नियुक्तीबाबतचा विषय कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर |
| | | Presented before the Board of Management the item of the appointment of Associate Adviser, Coordinator (Academic) and Assistant Coordinator (Administrative) on contract in various Departments / Centers / Units and Schools of the University approved by the Vice Chancellor under the authority of the Board of Management. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठाच्या विविध विभाग/ केंद्र/कक्ष व विद्याशाखा येथे करारावरील सहयोगी सल्लागार, शैक्षणिक सल्लागार, संयोजक(शैक्षणिक) व सहायक संयोजक (प्रशासकीय) यांच्या नियुक्तीबाबत सखोल चर्चा करण्यात आली. विद्यापीठात नॅक समिती येणार असल्यामुळे आणि गेल्या चार महिन्यापासून व्यवस्थापन मंडळाची बैठक होऊ शकली नाही. त्यामुळे तत्कालीन मा.कुलगुरूंनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिली. त्याची नोंद घेण्यात येऊन यापुढे समिती नेमून आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत पुढील कार्यवाही करावी असे ठरले. |
| 182.5.0 | | मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचे विषय<br>Any other item with the permission of Chair |
| | 182.5.1 | दृकश्राव्य केंद्रातील तांत्रिक व व्यावसायिक पदांच्या पदोन्नतीबद्दलचा ड्राफ्ट स्टॅट्युट मान्यतेसाठी सादर... |

| | | |
|---|---|---|
| | | (टिपणी – दि. 27.11.2021 रोजी दृकश्राव्य केंद्राच्या तांत्रिक आणि व्यावसासिक पदांच्या पदोन्नतीबद्दलचा ड्राफ्ट स्टॅट्युट मा.कुलपतींच्या मान्यतेसाठी पाठविला होता. त्यामध्ये दि. 17.02.2022 रोजी पुणे येथे परिनियम छाननी समितीने त्यात बदल सुचविले होते. त्याबद्दलचे पत्र दि. 01.03.2022 रोजी मा.कुलपती कार्यालयाकडून विद्यापीठास प्राप्त झाले. ड्राफ्ट स्टॅट्युटमध्ये सुचविलेले बदल विद्यापीठाने मा.कुलपती यांच्या मान्यतेसाठी पाठवायचा आहे. तरी सुधारित ड्राफ्ट स्टॅट्युटला मा.व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळण्यासाठी सादर. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - दृकश्राव्य केंद्रातील तांत्रिक व व्याबसायिक पदांच्या पदोन्नतीबद्दलचा ड्राफ्ट स्टॅट्युट मा.कुलपती यांच्या मान्यतेसाठी पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 182.5.2 | खातेअंतर्गत पदोन्नती समिती बैठक दि.26.4.2022रोजी झालेल्या अहवाल मान्यतेसाठी<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - खाते अंतर्गत पदोन्नती समिती दि. 26.4.2022 बैठक अहवालानुसार श्री. प्रकाश पंजाबराव मानकर, कक्ष अधिकारी (गट-ब) यांना गट-अ मधील सहायक कुलसचिव पदावर केलेल्या पदोन्नतीच्या शिफारशीस मान्यता देण्यात आली. |
| | 182.5.3 | विद्यापीठातील नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचा-यांना सुधारीत दरानुसार वाहतुक भत्ता (शासन निर्णय क्र. वाहभ-2020/प्रक 03 /2020/सेवा-5 दि.20.4.2022) अदा करणेबाबत |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – उपरोक्त संदर्भिय दि.20.4.2022 च्या शासन निर्णयानुसार विद्यापीठातील नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना दि. 01.04.2022 पासून सुधारीत दरानुसार वाहतुक भत्ता अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 182.5.4 | विद्यापीठातील डॉ.अभय पाटील, सहायक प्राध्यापक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा होमिओपॅथीच्या शिक्षकाचे करिअर अँडव्हान्स योजनेअंतर्गत पदोन्नती आणि वेतननिश्चिती करिता उपलब्ध शासन निर्णयानुसार सेवाशर्तींना मान्यतेबाबत.... |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** – सदर विषयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व शिक्षक संवर्गातील पदांना करिअर ॲडव्हान्स स्कीम लागू आहे. मात्र राज्यात होमिओपॅथी या शिक्षणक्रमाचे कुठलेही शासकीय महाविद्यालय नसल्यामुळे त्याबाबत शासनाचे कुठलेही नियम नाहीत. त्यामुळे या विषयाच्या शिक्षकांसाठी करिअर ॲडव्हान्स स्कीमबाबत योग्य निर्णय घेण्याकरिता सदरचा विषय ठेवण्यात आला होता. परंतु मा.कुलगुरू यांनी सदर विषय वेळेवर सादर करण्यात आला असल्यामुळे आता याबाबत निर्णय घेणे योग्य होणार नाही असे सांगितले. |
| | 182.5.5 | विद्वत परिषद व नियोजन मंडळावर नवीन सदस्यांच्या नियुक्तीबाबत.<br>(टिपणी - विद्वत परिषद विद्यापीठ परिनियम क्रमांक 5 (1/1992)<br>- (1)See statute 8(a) of the Act 3 (iv) अन्वये Not more than 4 teachers other than Directors of the Schools of Studies to be nominated by the Board of Management on the recommendations of the Vice-Chancellor<br>- (2) See statute 8(a) of the Act मधील 3(viii) अन्वये Not less than 10 persons who are not employees of the University Co-opted / Nominated by Academic Council / Board of Management for their special knowledge |

| | | |
|---|---|---|
| | | from the fields of Industries, trade and commerce, academic and professional organisations, communication field, agriculture and agro-industries, services etc.<br>नियोजन मंडळावर विद्यापीठ परिनियम क्रमांक 3(1/1992)<br>See the sub-section (2) of section 18 of the Act मधील<br>(iv) अन्वये Three member nominated by Board of Management out of which two shall be distinguished persons from the field of (i) Education (ii) Research (iii) Technical and Vocational Education (iv) Agriculture (v) Industries (vi) Management (vii) Commerce (viii) Science and Technology (ix) Distance Education and one shall be from amongst the Board of Management<br>दि. 30ऑक्टोबर 2021 च्या व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 179.3.8 नुसार. मा.आ.श्री.सुहास कांदे आणि मा.डॉ.संजय चोरडिया यांची नियुक्ती केलेली आहे परंतु डॉ.महेंद्र कडू यांची मुदत दि. 01.04.2022 रोजी संपृष्टात आल्याने नवीन सदस्य नामनिर्देशन करण्याचे प्रस्तावित आहे.त्यानुसार एक सदस्य नियुक्तीबाबत |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव –**<br>01. विद्वत परिषद विद्यापीठ परिनियम क्रमांक 5(1/1992) See statute 8(a) of the Act 3 (iv) तरतुदीनुसार विद्यापीठातील चार सदस्य तसेच Act 3(viii) अन्वये दहा सदस्य नियुक्तीबाबत<br>02. तसेच नियोजन मंडळावर विद्यापीठ परिनियम क्रमांक 3(1/1992) See the sub-section (2) of section 18 of the Act मधील (iv) अन्वये एक सदस्य नियुक्तीबाबत<br>वरीलप्रमाणे विद्वत परिषद विद्यापीठ व नियोजन मंडळावर सदस्य नियुक्तीचा अधिकार मा.कुलगुरु यांना प्रदान करण्यात आली यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 182.5.6 | राजभवन, मुंबई येथील जैवविविधता प्रकल्पात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने सहभागी होण्याबाबत.. |
| | | वरील विषय मा.कुलगुरूंच्या मान्यतेने वेळेवर बैठकीत ठेवण्यात आला व त्याबाबत मा.कुलगुरूंनी खालीलप्रमाणे माहिती दिली.<br>मा.कुलपती महोदय यांनी मा.कुलगुरू डॉ.पी.जी.पाटील यांचे अध्यक्षतेखाली मुंबई येथील राजभवन परिसरात जैवविविधता प्रकल्प निर्माण करण्याकरिता समिती गठीत केलेली आहे. सदर प्रकल्पामध्ये महाराष्ट्रातील सांस्कृतिक व सामाजिक विविधता तसेच राज्यातील महत्वाच्या ऐतिहासिक स्थळे इत्यादी बाबी तंत्रज्ञानाचा उपयोग करून राजभवन परिसरात प्रदर्शित करण्यात येतील. तसेच तेथे जैवविविधता निर्माण होण्याच्या दृष्टीने तीन टप्प्यात प्रकल्प राबवायचा आहे. या प्रकल्पामध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, श्री शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सहभागी झालेले आहेत. या प्रकल्पात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने देखील सहभागी व्हावे अशी |

| | | |
|---|---|---|
| | | सूचना मा.कुलगुरू डॉ.पी.जी.पाटील यांनी मांडली.<br>व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ.महेंद्र लामा यांनी सदर प्रकल्पाबाबत बोलतांना भारतातील उत्तर-पूर्व राज्यातील जैवविविधेतबद्दल माहिती दिली व त्याचा या प्रकल्पात अंतर्भाव करावा अशी सूचना केली, त्यास मा.कुलगुरूंनी संमती दिली.<br>उर्वरीत सर्व सदस्यांनी सदर प्रकल्पास सहभागी होणे ही एक विद्यापीठासाठी गौरवाची बाब आहे असे सांगितले. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** — राजभवनातील जैवविविधता प्रकल्पात सहभागी होण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 182.5.7 | सभेच्या शेवटी कुलसचिवांनी विद्यापीठाला नॅक मानांकनात पहिल्या फेरीत 'अ' श्रेणी प्राप्त झाल्याबद्दल माहिती दिली. सर्व उपस्थित सदस्यांनी विद्यापीठातील मा.कुलगुरु, मा.कुलसचिव सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी व इतर सहकारी यांचे अभिनंदन केले. तसेच माजी कुलगुरु डॉ. वायुनंदन यांनी नॅकसंदर्भात केलेल्या योगदानाबद्दल अभिनंदन केले.<br>मा.कुलगुरुंनी नॅक टीमच्या विद्यापीठ भेटी दरम्यान व्यवस्थापन मंडळाचे उपस्थित असणारे मा. सदस्य डॉ.अनिल कुलकर्णी, आमदार डॉ.सुधीर तांबे, श्री.उदित सेठ, डॉ.जयदीप निकम यांचे आभार मानले.<br>विद्यापीठाच्या प्रगतीच्या दृष्टीने, पुढील वाटचालीसंदर्भात सर्व मा.व्यवस्थापन मंडळ सदस्य एकत्र येऊन चर्चा करावी अशी सुचना मा.श्री.उदीत सेठ यांनी मांडली. मा.कुलगुरूंनी सदर बैठक दीक्षांत समारंभाच्या वेळी घेण्यात येईल असे सांगितले. मा.कुलगुरूंनी सदर सूचनेचे स्वागत करून दीक्षांत समारंभानंतर बैठक घ्यावी असे निर्देश दिले. |

सभेच्या शेवटी सर्व सदस्यांचे आभार मानून मा.कुलगुरु तथा अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले

**सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

**अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**